




॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे








अहिल्यानगर | शनिवार, दि. ३१ मे २०२५ | वर्ष ६ वे | अंक ४७ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com


## SPOT NEWS

### फरार निलेश चव्हाण अटकेत

● **पुणे** – वैष्णवी हगवणे प्रकरणातील आरोपी निलेश चव्हाण हा गेल्या १० दिवसांपासून फरार होता. निलेश चव्हाणच्या शोधासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांची चार पथकं तर पुणे पोलिसांची तीन पथकं राज्यात आणि देशातील इतर राज्यांमध्येही शोध घेत होती. अखेर पिंपरी-चिंचवड पोलिसांना निलेश चव्हाण याला ताब्यात घेण्यात यश आले आहे. दरम्यान, वैष्णवी हगवणेला आत्महत्येला प्रवृत्त केल्याबद्दल हगवणे कुटुंबियांसह निलेश चव्हाणला बावधन पोलिसांनी सहआरोपी केले आहे. तर पुणे पोलिसांच्या वारजे पोलिसांनी त्याला वैष्णवीच्या बाळाची हेळसांड केल्याबद्दल त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. निलेश चव्हाण हा वैष्णवीची नणंद असलेल्या करिष्मा हगवणेचा मित्र आहे. वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणातील आरोपी निलेश चव्हाण हा अटक होण्याआधीच फरार झाला होता. त्यामुळे पोलिसांनी त्याच्या शोधासाठी हालचाली सुरू केल्या होत्या. त्याला देशाबाहेर पलायन करण्यापासून रोखण्यासाठी लुक आऊट नोटीस जारी करण्यात आली होती. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी निलेश चव्हाणच्या शोधासाठी विशेष पथकांची स्थापना केली होती. या पथकांकडून विविध ठिकाणी तपास केला जात होता.

### मुंबई इंडियन्स'चा 'क्वॉलिफायर २' मध्ये प्रवेश

● **नवी दिल्ली** – मुंबई इंडियन्सने हार्दिक पांड्या याच्या नेतृत्वात आयपीएल २०२५ च्या क्वालिफायर २ मध्ये धडक दिली आहे. मुंबईने रंगतदार झालेल्या एलिमिनेटर सामन्यात गुजरात टायटन्सचा धुव्वा उडवला आहे. मुंबईने यासह क्वालिफायर २ चे तिकीट मिळवले आहे. मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्सला विजयासाठी २२९ रन्सचे टार्गेट दिले होते. मात्र मुंबईच्या गोलंदाजांसमोर गुजरातला २० ओव्हरमध्ये ६ विकेट्स गमावून २०८ रन्सच करता आल्या. मुंबई इंडियन्सने २२८ धावा करत विजयासाठी २२९ धावांचे आव्हान दिले होते. शेवटच्या १२ चेंडूत ३६ धावांची गरज होती. पण बोल्टने हे षटक जबरदस्त टाकले आणि शेवटच्या षटकात २४ धावा ठेवल्या. गुजरात टायटन्सला शेवटच्या षटकात फक्त ४ धावा करता आल्या. यासह मुंबई इंडियन्सने गुजरातचा २० धावांनी पराभव केला. या विजयासह मुंबई इंडियन्सने क्वॉलिफायर २ फेरीत एन्ट्री मारली आहे. क्वॉलिफायर पंजाब किंग्सशी लढत होणार आहे. या सामन्यात विजयी संघ अंतिम फेरीत आरसीबी दोन-दोन हात करणार आहे.

# ढेकळांचे पंचनामे करायचे का?

## कृषीमंत्री कोकाटेंचे वादग्रस्त वक्तव्य । नंतर केली सारवासारव


● **नाशिक । वीरभूमी**–

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे त्यांच्या विधानावरून कायमच चर्चेत असतात. काही दिवसांपूर्वी माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून एक विधान केलं होतं. त्यामुळे त्यांच्यावर राज्यभरातून टीका झाली होती. त्यानंतर त्यांनी माफी देखील मागितली होती. त्यानंतर आता कृषीमंत्री कोकाटे यांनी पुन्हा एक वादग्रस्त वक्तव्य केलं आहे.

अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची नाशिकमध्ये पाहणी करत असताना कोकाटे यांनी ढेकळांचे पंचनामे करायचे का?, असं वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. त्यांच्या या विधानानंतर राज्यभरातून टीकेची झोड उठली. यानंतर अखेर कृषीमंत्री कोकाटे यांनी आपल्या विधानावर स्पष्टीकरण देत सारवासारव करण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या शब्दाचा वेगळा अर्थ घेतल्याचं कोकाटे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

सध्या शेतात कपाशी नाही, सोयाबीन नाही. आता फळबागा उभ्या आहेत आणि अवकाळी पावसामुळे फळबागांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालेलं आहे. पण माझ्या शब्दाचा अर्थ तुम्ही वेगळा घेता त्याला मी काय करू? आता ज्या शेतात काहीही नाही तेथील पंचनामे करून काय करणार? पण काद्यांच्या बाबतीत पंचनामे करण्याच्या सूचना मी दिलेल्या आहेत. ज्या-ज्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेलं आहे त्या-त्या ठिकाणी पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत, असं माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे.

तसेच अवकाळी पावसामुळे ज्या शेतकऱ्यांचं नुकसान झालं, त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळेल. ज्या शेतकऱ्यांच्या शेतात पिके आहेत त्यांना माझं वक्तव्य वेगळं वाटण्याचं काही कारण नाही. पण ज्या शेतकऱ्यांच्या शेतात पिके नाहीत त्याचे पंचनामे कसे करणार? त्यामुळे जे खरं आहे तेच बोललो. शब्द चुकला असेल पण माझ्या बोलण्याचा वेगळा अर्थ घेतला, असं माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे.



# दहशतवाद नष्ट करणारच!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा निर्धार

● **नवी दिल्ली । वीरभूमी**–

भारत आता भारत राहला नसून प्रतिशोधाची ताकद बनला आहे. यामुळे दहशतवाद कोणत्याही परिस्थितीच नष्ट करणारच असल्याचा निर्धार पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी बिहारच्या कराकट येथील सभेत शुक्रवार दि. ३० मे रोजी केला.

पहलगाम येथील अलीकडील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख करत मोदी म्हणाले की ज्यांनी पाकिस्तानातून आमच्या देशावर हल्ले घडवले, त्यांच्या लपण्याच्या जागा उद्ध्वस्त करण्यात आल्या आहेत. भारत आता जुना राहिलेला नाही; नव्या भारताने प्रतिशोधाची नवी ताकद दाखवली आहे. त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'चा उल्लेख करत म्हटले की, भारतीय सैन्याने दहशतवाद्यांच्या तळांवर कठोर प्रहार केला. "भारतीय सैन्याच्या साहसामुळे जगाने आमच्या सिंदूरची ताकद पाहिली आहे असे ते म्हणाले. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारमधील कराकट येथे झालेल्या भव्य सभेत ४८,५२० कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन व पायाभरणी केली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांनी दहशतवादाविरोधातील देशाच्या लढ्याचा पुनरुच्चार केला. तसेच, नक्षलवादाच्या विरोधातील यशस्वी मोहिमेवर प्रकाश टाकला.

मोदींनी बीएसएफच्या उपनिरीक्षक इम्तियाज यांच्या बलिदानाची आठवण करून दिली. आपले जवान देशाच्या सुरक्षेसाठी अभेद्य ढाल बनून उभे राहिले आहेत. ऑपरेशन सिंदूरमध्ये त्यांच्या शौर्याला संपूर्ण जगाने सलाम केला आहे असे ते म्हणाले.

नक्षलप्रभावित भागांबाबत बोलताना पंतप्रधानांनी म्हटले की २०१४ पूर्वी १२५ जिल्हे नक्षलग्रस्त होते, तर आता ही संख्या केवळ १८ वर आली आहे. रुग्णालये, मोबाईल टॉवर्स, रस्ते आणि रोजगाराच्या संधी आता नक्षलग्रस्त भागांमध्ये पोहोचत आहेत. आता तो दिवस दूर नाही, जेव्हा माओवादी हिंसाचार पूर्णत: नष्ट होईल.

# ३८ बांगलादेशी घुसखोर पोलिसांच्या ताब्यात

## बिहारमध्ये आश्रय मिळेना म्हणून दिल्लीत थाटला संसार

● **नवी दिल्ली । वीरभूमी**–

बांगलादेशी घुसखोरांना पकडून त्यांना सीमेपार त्यांच्या देशात पाठवण्याची भारतीय सैन्याची मोहीम आता आणखी तीव्र झाली आहे. नुकतीच दिल्लीतून ३८ बांगलादेशी घुसखोरांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये काही महिला आणि लहान मुले यांचा देखील समावेश आहे.

दिल्लीमध्ये संसार थाटण्यापूर्वी या लोकांनी बिहार आणि नुहमध्ये आश्रय घेण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, तो निष्फळ ठरला. त्यानंतर त्यांनी दिल्लीतच मुक्काम ठोकला होता. या लोकांना आता पोलिसांनी आपल्या ताब्यात घेतले आहे. याबाबत माहिती देताना अधिकाऱ्यांनी सांगितले की, सध्या ताब्यात घेतलेले घुसखोर आधी हरियाणाच्या नुहमध्ये आणि नंतर बिहारमध्ये देखील गेले होते. त्यानंतर ते दिल्लीत आले. या लोकांनी सुरुवातीला बिहारमध्ये मुक्काम करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, या भागांमध्ये त्यांना आपला जम बसवता आला नाही. या ठिकाणी काहीच काम न मिळाल्यामुळे त्यांनी दिल्ली गाठली आणि तिथल्या करखान्यांमध्ये काम करू लागले. इतकंच नाही तर, तिथेच झोपडी वजा घरे बांधून अवैधरित्या राहू लागले.



पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या लोकांमध्ये काही लहान मुले आणि महिला देखील सामील आहेत. सगळ्यांनी बांगलादेशातून भारतात घुसखोरी केलेली होती. या लोकांकडे आवश्यक कागदपत्रे देखील नव्हती.

बांगलादेशी घुसखोरांना शोधून त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी पोलिसांनी गेल्या वर्षी १९ नोव्हेंबर रोजी दिल्लीत कारवाई सुरू केली होती. आतापर्यंत शेकडो बांगलादेशी पकडले गेले आहेत. अनेकांना बांगलादेशला परत पाठवण्यात आले आहे. या लोकांच्या अटकेमुळे घुसखोरांना बनावट आधार कार्डसह विविध प्रकारची कागदपत्रे पुरवणारे अनेक नेटवर्क उघड झाले आहेत. पहलगाममधील दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर सैन्य दलाची ही मोहीम आणखी तीव्र झाली आहे.

# नीट-पीजी परीक्षा एकाच शिफ्टमध्ये घ्या

## सर्वोच्च न्यायालयाचे 'एनबीई'ला आदेश

● **नवी दिल्ली । वीरभूमी**–

नीट-पीजी २०२५ च्या परीक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयाने एक मोठा निर्णय दिला आहे. नीटी-पीजी २०२५ ची परीक्षा एकाच शिफ्टमध्ये करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने नॅशनल बोर्ड ऑफ एग्जामिनेशन्स(एनबीई) ला दिलेत. २ शिफ्टमध्ये परीक्षा घेण्याच्या एनबीईचा निर्णय कोर्टाने फेटाळत हा मनमानी आणि विद्यार्थ्यांवर अन्यायकारक निर्णय असल्याचे म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने नॅशनल बोर्ड ऑफ एग्जामिनेशन्स(एनबीई) ला निर्देश देत म्हटले की, बोर्डाने पारदर्शकपणे परीक्षा एकाच शिफ्टमध्ये घेण्याची व्यवस्था करावी. १५ जूनला होणाऱ्या परीक्षेसाठी आवश्यक व्यवस्था करण्यासाठी अद्यापही वेळ आहे. दुसऱ्यांदा देण्यात आलेल्या सवलतीशी संबंधित मुद्द्यावर परीक्षा संपल्यानंतर विचार केला जाईल असे कोर्टाने सांगितले. जरी परीक्षा मंडळाने अधिक केंद्रे ओळखण्याचा संदर्भ दिला तरी



त्याला अधिक वेळ लागू शकतो. ज्यामुळे परीक्षा आयोजित करण्यास विलंब होऊ शकतो आणि सर्व परिणामी केंद्र आणि प्रवेश इत्यादी गोष्टी या न्यायालयाने ठरवलेल्या वेळेच्या मर्यादेनुसार होणार नाहीत असा प्रतिवादींच्या वतीने एक युक्तिवाद मांडण्यात आला आहे. हा युक्तिवाद देखील फेटाळण्यात आला आहे.

मागील काही वर्षांपासून नीट पीजीसारखी परीक्षा २ वेगवेगळ्या शिफ्टमध्ये घेतल्या जात होत्या. मात्र कोर्टाने या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कोणत्याही दोन प्रश्नपत्रिकांची कठीण पातळी पूर्णपणे समान मानता येत नाही. ही परिस्थिती असमानता आणि मनमानी निर्माण करते. अशा परिस्थितीत सर्व विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी एकाच शिफ्टमध्ये परीक्षा घेणे आवश्यक आहे असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. कोर्टाच्या या निर्णयामुळे मेडिकलच्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सर्व उमेदवार एकाचवेळी एकसारखेच प्रश्नावलीत परीक्षा देऊ शकतात ज्यामुळे ही परीक्षा पद्धत निष्पक्ष आणि पारदर्शक होऊ शकते.

### १५ जूनला प्रस्तावित नीट पीजी परीक्षा

■ परीक्षा वेळापत्रकानुसार, नीट पीजी २०२५ ची परीक्षा १५ जूनला आहे. याआधी परीक्षा २ शिफ्टमध्ये आयोजित करण्यात आली होती. परंतु आता सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर बोर्डाला नव्याने परीक्षा कार्यक्रम जारी करावा लागणार आहे. एकाच शिफ्टमध्ये परीक्षा घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

# २,६५२ सरकारी कर्मचारी निघाल्या 'लाडकी बहीण'



● **मुंबई । वीरभूमी**–

गलेलठ्ठ पगार तरीही मोह महाराष्ट्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना म्हणजे 'लाडकी बहीण'. लाडकी बहीण योजनेसाठी लाखो महिलांनी अर्ज केले होते. योजनेचा गैरफायदा राज्य सरकारी कर्मचारी महिलांनी घेतल्याच्या तक्रारी आल्यानंतर १.२० लाख महिला सरकारी कर्मचाऱ्यांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याची माहिती उघडकीस आली आहे.

दरम्यान, लाडकी बहीण योजनेसाठी आलेल्या अर्जांची पडताळणी केल्यानंतर अनेक महिला अपात्र असतानाही त्यांनी या योजनेचा लाभ घेतला असल्याचे समोर आले होते. त्यानंतर या महिलांचे अर्ज बाद करण्यात आले होते. मात्र आता आणखी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही असे शासन निर्णयातच स्पष्ट करण्यात आले होते. तरीही महिला कर्मचाऱ्यांनी अर्ज भरले तसेच योजनेचा लाभही घेतला आहे. यात वर्ग तीन आणि वर्ग चारच्या महिला कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. आणखी सहा लाख कर्मचाऱ्यांची अशाच पद्धतीने तपासणी केली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

माहिती व तंत्रज्ञान विभागाला सामान्य प्रशासन विभागाने १ लाख ६० हजार कर्मचाऱ्यांचा यूआयडी डेटा उपलब्ध करून दिला. सेवार्थ प्रणालीवर या कर्मचाऱ्यांची नावे नोंदविलेली होती. त्यापैकी किती महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला, हे तपासण्यासाठी मोहीम हाती घेण्यात आली होती. त्यात २,६५२ महिला कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात थेट पैसा गेला असे निर्दशनास आले. त्यांनी ऑगस्ट २०२४ पासून एप्रिलपर्यंत म्हणजे ९ महिन्यांत प्रत्येकी १३ हजार ५०० रुपये घेतले. याचा अर्थ ३ कोटी ५८ लाखांची कमाई त्यांनी केली असल्याचे समोर आले आहे.

या योजनेत जे नियम आणि निकष आहेत, त्या नियमात न बसणाऱ्या महिलांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचे काही महिन्यांपूर्वी निर्दशनास आलं होते. २.५० लाखांच्या वर वार्षिक उत्पन्न, घरी चारचाकी गाडी, तसेच कुटुंबातील व्यक्ती शासकीय नोकरीत नको, असे सरकारचे या योजनेतील नियम आणि निकष सांगताहेत. या योजनेतून शासकीय कर्मचाऱ्यांनी घेतलेला लाभ तपासण्यासाठी अजून ६ लाख लाभार्थ्यांची पडताळणी होणार असल्याची माहिती समोर येतेय.

विशेष म्हणजे लाडकी बहीण योजनेत लाभ घेतलेल्या शासकीय कर्मचारी महिला या वर्ग ३ आणि वर्ग ४ मधील आहेत. धक्कादायक म्हणजे ८ लाख ८५ हजार महिलांनी चक्क दोन योजनांचा लाभ घेतल्याचंही समोर आला आहे. लाडकी बहीण योजना आणि नमो शेतकरी योजना या दोन्ही योजनांचा लाभ ८ लाख ८५ हजार महिलांनी घेतल्याचे समोर आले आहे.

### सरकार करणार वसुली

■ ज्या २,६५२ महिला कर्मचाऱ्यांनी लाडक्या बहिणी योजनेचा गैरफायदा घेतला त्यांच्याकडून आता या रकमेची म्हणजेच ३ कोटी ५१ लाख रुपयांची वसुली करण्यात येणार आहे. प्रत्येक विभागाला त्याबाबतचा आदेश सामान्य प्रशासन विभागाकडून लवकरच सर्व शासकीय विभागांना देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### न्याय देण्याची जबाबदारी महिला आयोगाची : रुपाली चाकणकर

● **नाशिक । वीरभूमी**–

पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरण उघडकीस आल्यानंतर महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. यानंतर आज 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. रुपाली चाकणकर यांच्यावर चहूबाजूने टीका झाल्यानंतर त्या आज नाशिकमध्ये महिलांच्या तक्रारी जाणून घेण्यासाठी दाखल झाल्या.

नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमाची जनसुनावणी पार पडली. या जनसुनावणीत तक्रारदार, पीडित महिलेला स्थानिक पातळीवर तात्काळ मदत व्हावी, कोणतीही पीडित महिला कोणतीही पूर्वसूचना न देता थेट जनसुनावणीस उपस्थित राहून आपली समस्या लेखी स्वरूपात आयोगापुढे मांडता आली.

यावेळी रुपाली चाकणकर भाषण करताना म्हणाल्या की, महिलांच्या बाजूने कायदा आहे. कडक कायदा आहे. मात्र, त्यातून पळवाट काढली जाते. ग्रामीण भागात आजही जन्म दाखल्यात बदल करून बालविवाह केला जातो. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक अत्याचाराविरोधात देखील आवाज उठविला पाहिजे, त्याचा अधिकार आपल्याला आहे. जनसुनावणीत अनेक तक्रारी आल्या आहेत. त्याचा न्यायनिवाडा आपण करत आहोत.



# राज्यात पावसाची विश्रांती!

## जमिनीत ओलावा, पेरण्या खोळंबल्या । २ जूनपर्यंत पावसाची शक्यता

● **पुणे । वीरभूमी**–

वेळेआधीच आलेल्या पावसामुळे राज्यातील शेतपिकांना मोठा फटका बसला असून दहा-बारा दिवसांच्या पावसाने शेतीचे अर्थकारण बिघडवले आहे. मात्र आता राज्यातील पाऊस विश्रांती घेणार असल्याचा अंदाज शुक्रवार दि. ३० मे रोजी हवामान विभागाच्या वतीने वर्तविण्यात आला.

अंदाजानुसार सध्या बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाला असून छत्तीसगड, ओडिसा आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये सध्या मान्सून प्रवास करत आहे. येत्या तीन दिवसात कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. ३१ मे ते २ जून या कालावधीत मध्य महाराष्ट्र, कोकण वगळता राज्यातील बहुतांश ठिकाणी पावसाची उघडीप राहणार आहे. पावसाने विश्रांती घेतली असली तरी देखील राज्यभरात सगळीकडे जोरादार पाऊस झाला.

आज देखील राज्यात काही ठिकाणी पावसाचा जोर कायमच राहू शकतो. हवामान खात्याने आज विदर्भाला पावसाचा येलो अलर्ट दिला आहे. तर उर्वरीत राज्यात काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, आज विदर्भातील अमरावती, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया जिल्ह्यात जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच बुलडाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. या सर्व जिल्ह्यांना हवामान खात्याने येलो अलर्ट दिला आहे.

### पेरण्या खोळंबल्या

मृग नक्षत्रापूर्वीच आलेल्या संततधार पावसाने शेतकऱ्यांची चिंता वाढवली आहे. बीज पेरले नाही मातीत, तरी चिंतेचा पाऊस पडे मनात, अशी सध्या बळिराजाची अवस्था झाली आहे. मान्सूनपूर्व पावसाने अक्षरश: झोडपून काढल्याने शेतात पाणी साचले असून, रोहिणी नक्षत्रातील पेरण्या पूर्णपणे खोळंबल्या आहेत.

### पेरणीची घाई करू नये : कृषी विभाग

राज्यात ३१ मे ते २ जून दरम्यान पुन्हा जोरदार पाऊस येण्याची दाट शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी लगेच आज, उद्या पेरणीची घाई करू नये, राज्यात साधारण ३ जूननंतर मान्सूनचा पहिला टप्पा किंवा स्पेल संपेल त्यानंतरच म्हणजे साधारण जूनच्या पहिल्या आठवड्याच्या शेवटी शेतकरी वर्गाने पेरणीला सुरुवात करावी, असा सल्ला ज्येष्ठ कृषी हवामानतज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांनी दिला आहे. हवामान कोरडे होणार असल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे कृषी विभागाने म्हटले आहे.

### मशागतीची कामे ठप्प

शेती मशागतीची कामे ठप्प झाल्याने धूळवाफ पेरणी लांबणीवर पडली आहे. भाताचे तरवे घालणेही अशक्य झाले आहे. शेतात पाणी आणि चिखल साचला आहे आणि पेरणीचा हंगाम वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी पेरणीसाठी कर्ज घेतले असून, बिघडलेल्या वेळापत्रकामुळे मोठे आर्थिक संकट त्यांच्यासमोर उभे राहिले आहे.

### मराठवाड्यात पावसाची शक्यता

मराठवाड्यातील बीड, लातूर, परभणी, हिंगोली, नांदेड या सर्व जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच, उर्वरित राज्यात तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याचा अंदाज आहे.



# SPOT NEWS



## नगरच्या डॉ. कल्याणी बडे यांना नवी दिल्लीत भ्रूणतज्ज्ञ क्षेत्रातील डॉक्टरेट

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगरच्या नामवंत ज्येष्ठ भ्रूणतज्ज्ञ डॉ. कल्याणी रुशिकेश बडे यांना एमर्जिंग अचिव्हर्स अवॉर्ड कौन्सिलच्या वतीने भ्रूणतज्ज्ञ क्षेत्रातील डॉक्टरेट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथे झालेल्या या सन्मान सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बडे यांना गौरविण्यात आले. यावेळी डॉ. कल्याणी बडे यांनी हा पुरस्कार माझ्या आयुष्यातील सर्व पाठिंबा देणाऱ्या व्यक्तींचा आहे. माझी आई सरोजिनी नागरगोजे आणि वडील डॉ. प्रल्हाद नागरगोजे यांनी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल त्यांचे मी मनापासून आभार मानते. माझे पती रुशिकेश बडे आणि माझा मुलगा अवनीश बडे यांची मोठी साथ लाभली. मोठी बहीण डॉ. स्वप्नाली आणि भाची आस्था यांनी नेहमीच प्रेरणा दिली आहे. त्यांच्या प्रेमामुळे आणि पाठिंब्यामुळेच मी या टप्प्यावर पोहोचले आहे. तसेच, माझे मित्र परिवार आणि सहकारी यांनी प्रत्येक क्षणी माझा विश्वास वाढवला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. डॉ. कल्याणी बडे यांनी न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथून जैवतंत्रज्ञानात पदवी आणि पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. सध्या त्या अपोलो फर्टिलिटी सेंटर, मुंबई येथे ज्येष्ठ भ्रूणतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत आणि वंध्यत्व उपचाराच्या क्षेत्रात त्यांचे योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. डॉ. कल्याणी बडे यांचा प्रवास हा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आणि महिलांसाठी विशेषत: आरोग्य व विज्ञान क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरतो. छोट्या गावातून पुढे येऊन राष्ट्रीय स्तरावर पुरस्काररुपाने बहुमान मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## आबासाहेब सोनवणे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार प्रदान




**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

हिंगणगाव (ता. नगर) येथील प्रथम लोकनियुक्त सरपंच तथा सरपंच परिषदचे (मुंबई) राज्य कोअर कमिटी अध्यक्ष आबासाहेब सोनवणे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र रत्न गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अहिल्यादेवी फाउंडेशन (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त सोलापूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र रत्न गौरव या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा वितरणाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात सोनवणे यांना मा. आमदार प्रकाश अण्णा शेडगे यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी आयकर आयुक्त (पुणे) डॉ. नितीन वाघमोडे, आयकर आयुक्त (मुंबई) डॉ. सचिन मोटे, सहाय्यक पोलीस आयुक्त (पुणे) रुक्मिणीताई गलांडे, सहाय्यक पोलीस आयुक्त राम मांडूरले, मिसेस इंडिया श्वेता परदेशी, वक्ते प्रा.डॉ. यशपाल हिंगे, रिल स्टार प्राजक्ता मालुंजकर, फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक गोरड, कार्याध्यक्ष महादेव महानोर आदी मान्यवर उपस्थित होते. सोनवणे यांनी हिंगणगावच्या पहिल्या महिला सरपंच सौ. स्मिता (काकी) सोनवणे, उद्योजक जयंतराव नलावडे, मुकुंद दुबे, प्रा. सूरश्री सोनवणे, विद्याताई मोटे, अण्णा पाटील, शालिवाहन कोळेकर, तुकाराम पाटील यांच्या उपस्थितीमध्ये पुरस्कार स्विकारला.आबासाहेब सोनवणे यांनी गेल्या २५ वर्षे पंचायत राज व्यवस्था मध्ये सरपंच व सदस्य म्हणून काम पाहिले आहे. कृषी, जलसंधारण, पंचायत राज व्यवस्था बळकटीकरण, दुष्काळी गावाची ओळख पुसून पाणीदार हिंगणगाव ओळख निर्माण केल्याचे कार्य त्यांनी केले आहे. गावाशी जोडणारे सर्व रस्ते मजबुतीकरण, डांबरीकरण करुन शेतपानंद शिवार रस्ते मुक्त करून वहिवाटीस खुले करण्यास महत्त्वाची भूमिका बजावली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत पेयजल योजना राबवणे, गावातील प्राथमिक शाळा खोल्यांचे आरसीसी बांधकाम, पेव्हिंग ब्लॉक बसवणे, पशुवैद्यकीय दवाखाना इमारत, सुसज्ज असे अमरधाम, वृक्षारोपण आदी विकासात्मक व सामाजिक क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. कोरोना काळात झोकून काम करून आरोग्याच्या सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले. सांगली सातारा पूरग्रस्तांना मदत आदी त्यांच्या विविध क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# तिसगाव येथील कत्तलखाने जमिनदोस्त करा

### हिंदुत्ववादी संघटनांची तालुका प्रशासनाकडे मागणी । गोरक्षकांवर हल्ला करणाऱ्यांवर कडक कारवाईची मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी–**

काल तिसगाव येथे गोरक्षकावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर तालुक्यातील हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत. तिसगाव येथील बेकायदा कत्तलखाने जमिनदोस्त करावेत. गोरक्षकास जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या गावगुंडांना तातडीने अटक करून कडक कारवाई करावी अशी मागणी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल गोरक्षा समिती, हिंदू रक्षा युवा मंच आदी संघटनांनी प्रशासनाकडे केली आहे. याबाबतचे निवेदन तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांना देण्यात आले.

यावेळी विश्व हिंदू परिषदेचे किशोर परदेशी, बाळासाहेब गिते, नानासाहेब पालवे, आशुतोष शर्मा, दत्तात्रय गीते, महेश अंतरकर, आदिनाथ लगड, किशन फतपुरे, सोमनाथ बंग, सारंग मंत्री, तेजस पटवा, समर्थ रोडी, रवींद्र मोहिते, राजु हराळ, प्रकाश बालवे, सोमनाथ दुधाने, प्रवीण फुंदे यांच्या सह शेकडो तरुण हजर होते.

यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काल तिसगाव येथे भारत लिपारे या गोरक्षकावर जीवघेणा हल्ला झाला असुन नगर दक्षिण विभागातील सर्वांत मोठा कत्तलखाना तिसगांव येथे चालु



आहे. सदर कत्तलखान्याकडे प्रशासनाचे गांभीर्याने लक्ष नाही. मराठवाड्यातील आष्टी, शिरुर कासार, देवराई, पाटोदा, पैठण या तालुक्यांतुन व्यायसायीकांना तिसगांव येथुन गोमांसाची तस्करी केली जाते. पाथर्डी तालुक्यातील गोरक्षक आपले काम गोमातेच्या रक्षणासाठी प्रामाणिकपणे करत आहेत. गोमांस तस्करीमध्ये गोरक्षक कायदेशिर मार्गाने प्रतिबंध करतात या कामामध्ये अडथळा नको म्हणुन अवैध कत्तलखाने चालकांकडुन यापुर्वीही वेळोवेळी गोरक्षकांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रकार घडले आहेत. संघटीत गुन्हेगारीचा हा प्रकार तालुक्यात दिवसेंदिवस वाढत असुन या प्रकारातुन मोठा आर्थिक स्त्रोत निर्माण झालेला आहे. यातुन ही मंडळी दादागीरी, गुन्हेगारी, छेडखानी, अवैध शस्त्रविक्री व अवैध धंदे करत आहेत. यामुळे शहर व तालुक्यात कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे.

धार्मिक भावना दुखवत हेतुपुर्वक चाललेले हे प्रकार तातडीने रोखले न गेल्यास तालुक्यातील गोरक्षकांच्या जिवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. तिसगांव येथील अवैध पाच कत्तलखाने त्वरीत बंद करुन अशा प्रवृत्तीविरुध्द गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल करावेत. राज्य शासनाने संमत केलेल्या गोरक्षण कायद्याची तालुक्यात काटेकोर अंमलबजावणी व्हावी व खोटे गुन्हे दाखल होऊ नये व गोरक्षकांना संरक्षण मिळावे. गोतस्करांवर हद्दपारीची कारवाई करावी अन्यथा लोक भावनेचा उद्रेक होईल. येत्या सात दिवसांत यावर कारवाई करावी अन्यथा तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा ही या निवेदनात देण्यात आला आहे.

दरम्यान काल गोरक्षकाला झालेल्या अमानुष मारहाणी नंतर पोलिसांनी तिसगाव येथील आरोपी विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

## वीरगाव येथीलआनंदगड शैक्षणिक संकुलात तंत्रनिकेतन अभ्यासक्रमास मंजूरी

**● अकोले । वीरभूमी–**

आंतरभारती रूरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट, वीरगाव संचलित, आनंदगड तंत्रनिकेतन महाविद्यालयास (पॉलिटेक्निक कॉलेज) नुकतीच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद कडून सिव्हील, मेकॅनिकल, कम्प्युटर, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स आणि आर्टिफिशिअल इंटेलिजेंस व मशिन लर्निंग या पाच कोर्सेससाठी मंजुरी मिळालेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ प्रवेशासाठी तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई (DTE ०५६६२) व महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली असून महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने संलग्नता प्रदान केली आहे. सदर अभ्यासक्रमासाठी प्रवेशप्रक्रियेसाठी सुरु झालेली आहे. सदर डिप्लोमा ३ वर्षांचा असून प्रथम वर्षात दहावी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी ही सुवर्णसंधी असेल. संकुलातील धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडीयम



स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज व वसतिगृह, मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात डी. फार्मसी आणि बी. फार्मसी हे दोन्ही कोर्स तसेच अक्युपंक्चर डिप्लोमा यासर्व कोर्सेसचे प्रवेश सुरु आहेत अशी माहिती मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी प्राचार्या डॉ. पल्लवी फलके, प्राचार्य किरण चौधरी, विभागप्रमुख विद्याचंद्र सातपुते, सीमा दिघे, रवींद्र आंबरे यांनी दिली.

ग्रामीण भागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घेवून प्रवेश घ्यावेत असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, सचिव डॉ. अनिल रहाणे, सुप्रिया वाकचौरे आणि गीता रहाणे, शिवराज वाकचौरे, अक्षय रहाणे यांनी केले आहे.

# पारनेरला उभे राहणार स्मार्ट बसस्थानक

### आ. काशिनाथ दाते । पारनेर बसस्थानक पुर्नबांधणी भूमिपूजन संपन्न

**● पारनेर । वीरभूमी–**

गेल्या अनेक वर्षांपासून पारनेर बस स्थानकाचा प्रश्न प्रलंबित होता. शासनस्तरावर पाठपुरावा करून या बस स्थानकासाठी निधी प्राप्त झाला आहे. महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने हा प्रश्न मार्गी लागला आहे. पारनेर सारख्या तालुक्याच्या ठिकाणी आता स्मार्ट बस स्थानक नक्कीच उभे राहील असे मत आमदार काशिनाथ दाते सर यांनी व्यक्त केले.

पारनेर येथील बसस्थानकाच्या पुर्नबांधणी कामाचे भूमिपूजन आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते संपन्न झाले. महायुती सरकारच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नांतून या प्रकल्पासाठी २ कोटी ६६ लाख ५० हजार ८७५ रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.



या अद्यावत बसस्थानकाच्या इमारतीमुळे पारनेर शहराच्या वैभवात भर पडणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पारनेर बसस्थानकाची दुरावस्था नागरिकांसाठी डोकेदुखी ठरली होती. सर्व सुविधांनी युक्त अशी आधुनिक इमारत उभारण्याची तालुक्यातील नागरिकांची दीर्घकालीन मागणी होती. आ. काशिनाथ दाते यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करून निधी मंजूर केला आहे

नवीन इमारतीमुळे प्रवाशांना आधुनिक सुविधांचा लाभ होणार असून, शहराच्या सौंदर्यातही भर पडेल. या भूमिपूजन सोहळ्यास जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अशोकराव सावंत, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, ज्येष्ठ नेते वसंत चेडे, सुभाषराव दुधाडे, भास्कर उचाळे, अर्पणा खामकर, नगरसेवक युवराज पठारे, कांतीलाल ठाणगे, अशोक चेडे, सरपंच लहू भालेकर, मनोज मुंगसे, विकास पवार, उद्योजक मंगेश औटी, राजू औटी, सोनाबाई चौधरी, उपअभियंता काळभोर, आगार प्रमुख प्रशांत काळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि राज्य परिवहन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या प्रकल्पामुळे पारनेरच्या विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नागरिकांनी आमदार दाते यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले असून, लवकरच आधुनिक बसस्थानकाचे स्वप्न पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# शबरी महामंडळाच्या एफपीओ घोटाळ्याची न्यायालयीन चौकशी करा

### प्रमोद काळे यांची मागणी । लीना बनसोड यांच्या निलंबनाची मागणी

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

राज्याच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत शबरी महामंडळाच्या शेतकरी उत्पादक संघटन (एफपीओ) योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप आदिवासी शक्ती संघटनेचे अध्यक्ष प्रमोद काळे यांनी केला आहे. या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याची शिफारस करण्यासाठी ते ३१ मे २०२५ रोजी महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार आहेत. तसेच, शबरी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांच्या निलंबनाची आणि योजनेतील २०% बिगर आदिवासींच्या समावेशाची अट रद्द करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

प्रमोद काळे यांनी सांगितले की, शबरी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड आणि त्यांचे वरिष्ठ सल्लागार प्रशांत ब्राह्मणकर यांनी एफपीओ योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केले आहेत. केंद्र सरकारच्या विशेष केंद्रीय सहाय्य आणि २७५ (१) योजनेअंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांच्या विकासासाठी आणि समूह शेतीला चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. परंतु, या निधीचा गैरवापर करून योजनेचा मुख्य उद्देशच नष्ट करण्यात आला आहे. काळे यांच्या मते, लीना बनसोड यांनी धूर्तपणे हा निधी सधन आणि सवर्ण समाजासाठी वापरला, ज्यामुळे आदिवासी शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले. गैरव्यवहाराचा

एफपीओ योजनेत सभासद आणि संचालक मंडळात २०% बिगर आदिवासी समावेशाची तरतूद आहे. या तरतुदीचा गैरफायदा घेऊन लीना बनसोड आणि प्रशांत ब्राह्मणकर यांनी बिगर आदिवासींच्या सहकारी संस्था, कंपन्या आणि बचत गटांना रेड कार्पेट सुविधा उपलब्ध करून दिल्या. याउलट, ८०% आदिवासी सभासदांना योजनेचा कोणताही लाभ मिळाला नाही. अनेक सभासदांना आपण सभासद आहोत याची माहितीही नाही. विशेष म्हणजे, प्रकल्प प्रस्तावित जागेचा आणि पर्यायाने प्रकल्पाच्या मालकी हक्काचा लाभ बिगर आदिवासींकडेच राहत असल्याने हा गैरव्यवहार उघडकीस आला आहे

पुढे श्री. काळे यांनी आरोप केला की, शासन निर्णयातील प्राधान्यक्रमांना (आदिम जमाती, पारधी, विधवा, परितक्त्या आणि वैयक्तिक वनपट्टाधारक शेतकरी) पूर्णपणे नजरअंदाज करून लीना बनसोड आणि प्रशांत ब्राह्मणकर यांनी बोगस आणि केवळ कागदावरच अस्तित्वात असलेल्या संस्थांना प्राधान्य दिले. तळागाळातील रोजगार निर्मिती करणाऱ्या संस्थांचे प्रस्ताव लटकवून त्यांची मानसिक आणि आर्थिक फसवणूक केली जात आहे. इतकेच नव्हे, तर मंजूर केलेल्या प्रकल्पांना कोट्यवधी



रुपये वितरित करूनही गेल्या दीड-दोन वर्षांत एकही प्रकल्प प्रत्यक्षात उभा राहिलेला नाही.

प्रमोद काळे यांनी सांगितले की, लीना बनसोड यांच्यासारख्या प्रवृत्ती आदिवासी विकास आयुक्त पदावर राहिल्यास आदिवासींच्या विकासाच्या योजना केवळ कागदावरच राहतील. आज कोट्यवधींचा घोटाळा करून उपजीविकेचे प्रकल्प गायब केले आहेत. उद्या वस्तीगृहातील विद्यार्थ्यांच्या ताटातील पालेभाज्या, फळभाज्या, कडधान्य आणि पोषण आहारही गायब होतील. आदिवासींना विकास आणि सन्मानजनक जीवनापासून वंचित ठेवले जाईल, असे त्यांनी नमूद केले. त्यामुळे लीना बनसोड यांना तात्काळ निलंबित करावे, अशी मागणी ते राष्ट्रपतींकडे करणार आहेत.

शेतकऱ्यांच्या विकासासाठी आणि समूह शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी एमएसीपी, स्मार्ट, मॅग्नेट, नाबार्ड, पोकरा, सीएसआर आणि एनजीओमार्फत विविध अनुदान आणि कर्ज योजना उपलब्ध आहेत. परंतु, यातील अटी-शर्तींची पूर्तता आदिवासी शेतकरी आणि त्यांच्या कंपन्यांकडून होत नसल्याने ते स्पर्धेत टिकू शकत नाहीत आणि योजनांपासून वंचित राहतात. याच समस्येचा विचार करून केंद्र सरकारने एफपीओ योजनेसाठी निधी उपलब्ध केला होता, परंतु गैरव्यवहारांमुळे आदिवासी शेतकऱ्यांचे स्वप्न भंगले आहे.

या सर्व गैरप्रकारांची न्यायालयीन चौकशी व्हावी, लीना बनसोड यांचे निलंबन व्हावे आणि २०% बिगर आदिवासी समावेशाची अट रद्द व्हावी, यासाठी प्रमोद काळे शनिवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना भेटून विनंती करणार आहेत. या प्रकरणाने आदिवासी समाजात तीव्र संताप व्यक्त होत असून, योजनेच्या गैरव्यवहारांवर तात्काळ कारवाईची मागणी जोर धरत आहे.

# एकरी १०० टन पेक्षा जास्त ऊस उत्पादन होणे गरजेचे

### माजी कृषिमंत्री थोरात । थोरात कारखान्याच्या वतीने ऊस विकास मेळावा

**● संगमनेर । वीरभूमी–**

ऊस व दूध हे शेतकऱ्यांसाठी शाश्वत पीक आहे. शेतीमध्ये ठिबक सिंचनासह नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे. सातत्याने वापर होत असलेल्या शेतीमध्ये सेंद्रिय द्रव्यांची कमतरता झाली असून ती भरून काढण्याबरोबर कमी पाणी व कमी श्रमामध्ये एकरी १०० टना पेक्षा जास्त उत्पादन होणे गरजेचे असून यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन महाराष्ट्राचे माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

वाघापूर येथे सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने ऊस विकास मेळाव्यात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून ऊस विशेषज्ञ सुरेश माने हे होते तर व्यासपीठावर व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले, अ‍ॅड. नानासाहेब शिंदे, संचालक संपतराव गोडगे, विनोद हासे, नवनाथ आरगडे, सतीश वर्पे, डॉ. तुषार दिघे, रामदास धुळगंड, गुलाबराव देशमुख, अरुण वाकचौरे, अंकुश ताजने, रामनाथ कुटे, योगेश भालेराव, दिलीप नागरे, विलास शिंदे, अ‍ॅड. बाबासाहेब गायकर, बाजार समितीचे संचालक कैलासराव पानसरे, रवींद्र भोकनळ, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, कृषी अधिकारी भाऊसाहेब खर्डे आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी माजी कृषीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श तत्वावर कारखाना व सहकारी संस्था सुरू आहेत. अत्यंत काळजीपूर्वक व काटकसरीने कारखान्याचे कामकाज सुरू असून शेतकऱ्यांना चांगला भाव देण्यासाठी कारखाना कायम कटिबद्ध आहे. ऊस वाढ योजनेअंतर्गत एकरी शंभर टना पेक्षा जास्त ऊस उत्पादन करणे आणि ऊस लागवडीचे नियोजन करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

सर्व शेतकऱ्यांनी जून महिन्यामध्ये ऊस लागवड केली तर तोडणीसाठी अडचणी तयार होतात म्हणून टप्प्याटप्प्याने लागवडीचे नियोजन होणे अत्यंत गरजेचे आहे. याचबरोबर कमी पाणी, कमी श्रम आणि जास्त उत्पादन गरजेचे आहे. शेतीमध्ये अनेक दिवसाचे सातत्याने उत्पादन होत असल्याने आता सेंद्रिय युक्त द्रव्यांची कमतरता त्यामध्ये निर्माण झाली आहे ती भरून काढण्यासाठी कारखान्याच्या कृषी विभागाच्या मदतीने आपल्याला सेंद्रिय द्रवांचा वापर करावा लागेल.

ऊस शेती ही निष्काळजीपणे न करता अधिक काळजीपूर्वक केल्याने नक्कीच एकरी उत्पादन वाढेल असा विश्वास व्यक्त करताना थोरात कारखान्यावर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी व बाहेरील उत्पादक यांचाही मोठा विश्वास असल्याने कारखान्याचे सातत्याने गाळप चांगले होत असते. कार्यक्षेत्रात जास्त ऊस उत्पादन झाल्याने उपपदार्थांची निर्मिती जास्त होऊन त्याचा नक्कीच शेतकऱ्यांना फायदा होईल असे ते म्हणाले.

सुरेश माने म्हणाले की, शेतीमध्ये जास्त



पाण्यापेक्षा पाण्याचे नियोजन महत्त्वाचे आहे. याकरीता ठिबक सिंचनचा सर्वाधिक वापर करा. मे आणि जून महिन्यामध्ये हुमणी अळीचा प्रादुर्भाव आपल्याला कमी करता येतो यासाठी असणाऱ्या वेगवेगळ्या पद्धती त्यांनी समजावून सांगितल्या. उसाची व्हरायटी, लागवड पद्धत, खते, फवारणी याबाबत शेतकऱ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

यावेळी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर पिंपारणे, शेडगाव, शिबलापुर, पानोडी येथेही ऊस विकास मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे स्वागत अ‍ॅड. नानासाहेब शिंदे यांनी केले. प्रास्ताविक जगन्नाथ घुगरकर यांनी केले तर पांडुरंग पाटील घुले यांनी आभार मानले.

# भ्रष्टाचार लपविण्यासाठी जोर्वे गावात ग्रामसभेत राडा

## मागावर्गीयांच्या निधीवरही प्रश्नचिन्ह । आरोपांच्या फेरीत जोर्वे ग्रामसभा गाजली

**● संगमनेर । वीरभूमी–**

संपूर्ण गाव एकत्र एकवटले असताना आदिवासींचा निधी यांचा विविध विकास कामांचा निधी नेमका कुठे गेला असे अनेक प्रश्न विचारले असताना विखे समर्थक सत्ताधाऱ्यांना एकाही प्रश्नाचे उत्तर न देता त्यांनी ग्रामसभा गुंडाळण्याचा प्रयत्न केल्याने ग्रामसभेमध्ये मोठा राडा झाला.



जोर्वे येथे ग्रामसभा होती, परंतु ती ग्रामसभा गाजली काही विशिष्ट कारणांनी सामान्य जनता आपल्या कष्टाचा पैसा कर स्वरूपात सरकारला देत असते, व त्यातीलच काही निधी सरकार ग्रामपंचायतीला गावाच्या विकासासाठी देत असते, आज जोर्वे गावात गेली अडीच वर्ष या निधीचा संपूर्णपणे गैरवापर होत असल्याने, जाब विचारण्यासाठी सर्व ग्रामस्थ एकत्र आले होते. परंतु सरपंचांकडे याचे उत्तरच नसल्याने सत्ताधाऱ्यांकडून प्रश्न विचारांना विचारणाऱ्यांनाच दम देणे, धक्काबुक्की करणे असे प्रकार सुरू झाले, एकीकडे पंचक्रोशीत सांगायचे आम्ही विकास कामांची डोंगर उभे करत आहोत. परंतु त्याच वेळेस जेव्हा एक एक करून अनेक घोटाळे बाहेर निघायला सुरुवात झाली, त्यावेळेस मात्र ते हमरीतुमरीवर आले.

प्रश्न विचारणाऱ्याची गच्ची पकडणे लोटून देणे, लाथा बुक्क्यांनी मारहाण करणे, असे प्रकार सुरू झाले, पण सामान्य जनतेला ज्या प्रश्नांची उत्तरे अपेक्षित होते, ते एकही उत्तर भेटले नाही, ग्रामसेवकांनाही जे काही प्रश्न विचारण्यात आले त्याचे उत्तर त्यांना देता येत नव्हते, लाखो रुपयांचा गावात भ्रष्टाचार झाला, परंतु झालेल्या भ्रष्टाचाराची उत्तरे सरपंचांनाही व ग्रामसेवकांनाही देता येत नव्हती, शेवटी ग्रामस्थांनी सर्वच सदस्यांना धारेवर धरले तर उपसरपंच व सदस्यांनीही त्यांची हतबलता बोलून दाखवली व सांगितले. ह्या ग्रामपंचायतीत कोणत्या गोष्टी खरेदी केल्या जातात व कोणाला दिले जातात हे आम्हालाच कळत नाही, कोणता निधी कुठे वापरला जातो हेही कळून दिले जात नाही, गावात ग्रामपंचायत कर्मचाऱ्याला आलेला निधीही परस्पर दुसरीकडे वळवला जातो, वेगळाच माणसाच्या नावाने अकाउंट काढून त्यावर निधी वर्ग काढून तोही पैसा लंपास केला जातो, छोट्या छोट्या कामांचे मोठ मोठी बिले काढण्यात येतात..

हे ऐकून सर्वच जनता अवाक, झाली. जोर्वे गावात गेली ४० वर्ष जे कधीही घडले नाही, असा प्रकार आज घडत होता, शिव्या, भांडणे मारामाऱ्यानी संपूर्ण गाव हादरून गेले, युवा पिढी थोड्याशा प्रलोभनांना बळी पडून असे वागत असेल, तर भविष्य अवघड आहे, असे गावातील ज्येष्ठ मंडळींनी बोलून दाखवले. यावेळी सुरेश थोरात, सत्यजित थोरात हर्षल काकड, उपसरपंच बादशहा बोरकर, संजय थोरात, संपत थोरात, मुकेश काकड, राहुल बोरकर, भाऊसाहेब दिघे, बालम भवर, माणिकराव यादव, राजू थोरात, रमेश दिघे, अक्षय दिघे, विठ्ठल काकड, पंढरीनाथ बलसाने, गगन थोरात, डॉ. पवन काकड, अजित थोरात, शुभम दिघे, शांताराम दिघे, अमित थोरात, अण्णासाहेब थोरात, कैलास क्षीरसागर, जीवन काकड, ऋषिकेश थोरात, बाळासाहेब काकड, संदीप यादव, दत्तू नाना काकड, शुभम दिघे व इतर ग्रामस्थ यांनी अनेक प्रश्नांचा भडीमार केला सत्ताधाऱ्यांना एकाही प्रश्नाचे उत्तर न देता आल्याने त्यांनी गोंधळ घातला.

# SPOT NEWS



## गुरु अर्जुन देवजी यांच्या शहिदी दिनानिमित्त शहरात लंगर व सरबतचे वाटप

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

शीख धर्माचे पाचवे गुरु अर्जुन देवजी यांच्या शहिदी दिनानिमित्त तारकपूर येथे गुरु नानक देवजी (जीएनडी) ग्रुपच्या वतीने नागरिकांना लंगर (प्रसाद) व सरबतचे वाटप करण्यात आले. गुणे आयुर्वेदिक महाविद्यालयचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते प्रसाद वाटपाला प्रारंभ झाले. या कार्यक्रमाप्रसंगी जनक आहुजा, संजय आहुजा, जितू गंभीर, राकेश गुप्ता, किशोर कंत्रोड, मॉन्टी तलवार, गुरली अवतार, करण आहुजा, परभ गुलाटी, मनीष खुराना, विकी कंत्रोड, रोहित बत्रा, काजल गुरु, राजेश कंत्रोड, कुणाल गंभीर, गिरीश खन्ना, विजय मनोचा, सागर कुमार, अक्षय खुराना आदी उपस्थित होते. सचिन जगताप म्हणाले की, गुरू अर्जुन देव मानवतेचे खरे सेवक व धर्माचे रक्षक ठरले. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी लोकांची सेवा केली. तर अन्यायापुढे न झुकता शहिद झाले. अमानुष छळ सहन करुन धर्माप्रती ते निष्ठावान राहीले. शीख धर्मासाठी शहीद होणारे पहिले गुरू म्हणून ते अजरामर झाले. त्यांचे हौतात्म्य हे शीख धर्माच्या इतिहासाला कलाटणी देणारे ठरले. त्यांचे बलिदान आजही समाजासाठी प्रेरणा असल्याचे त्यांनी सांगितले. जनक आहुजा म्हणाले की, गुरु अर्जुन देवजी यांनी अमृतसर येथे असलेल्या गुरु रामदास सरोवरचे काम पूर्ण केले. शीख धर्मात असलेले गुरु ग्रंथ साहेब यांनी लिहून पूर्ण केले व त्याबाबत जनजागृती केली. ही जनजागृती मुघल साम्राज्याला बाधा आणणारी ठरल्याने त्यांनी गुरु अर्जुन देवजी यांचा अमानुषपणे छळ केला. धर्मासाठी त्यांनी अन्यायापुढे न झुकता आपली शहिदी दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## लहानू भाऊराव अरगडे यांचे वृद्धपकाळाने निधन

**● अकोले । वीरभूमी–**

संगमनेर येथील लहानू भाऊराव अरगडे यांचे (दि. २९) रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. मृत्यू समयी ते ७५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, पुतणे, सुना, जावई, नातवंडे, नात जावई, पतवंडे असा मोठा परिवार आहे. प्रताप लहानू अरगडे, उत्तम लहानू अरगडे, सचिन लहानू अरगडे यांचे ते वडील होत. संगमनेर येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मोठा जनसमुदाय उपस्थित होता.



## श्रीगोंदा न्यायालयातील कर्मचाऱ्याचा अकस्मात मृत्यू

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा जिल्हा न्यायालयात शुक्रवार दि. ३० रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास एक धक्कादायक घटना घडली. न्यायालयातील कर्मचारी राजेंद्र दगडु टकले (वय ५३, रा. अर्चना हॉटेल शेजारी, नेप्ती रोड, केडगाव, जि. नगर) यांचा अकस्मात मृत्यू झाला. मृत्यूचे कारण उलटी आणि छातीत दुखणे असल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजेंद्र टकले हे आपल्या नेहमीच्या कामानिमित्त श्रीगोंदा कोर्टात आले होते. काम करत असताना त्यांना अचानक उलटी आणि छातीत दुखण्याचा त्रास जाणवला. यानंतर कोर्टातील इतर कर्मचाऱ्यांनी त्यांना तातडीने खाजगी दवाखान्यात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. घटनेनंतर पोलीस निरीक्षक किरण शिंदे, हेड कॉन्स्टेबल राहुल शिंदे यांनी भेट दिली तर ठाणे अंमलदार नितीन गाडगे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद दाखल केली आहे. पुढील तपास हेड कॉन्स्टेबल राहुल शिंदे करत आहेत.



## तीन महिन्यांचे अन्नधान्याचे आगाऊ वाटप; लाभार्थ्यांनी वेळेत लाभ घ्यावा

**● नगर । वीरभूमी–**

पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या प्रतिकूल हवामानामुळे अन्नधान्य वितरणात अडथळा येऊ नये, म्हणून केंद्र सरकारने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम अंतर्गत ऑगस्ट २०२५ पर्यंतच्या अन्नधान्याचे आगाऊ वितरण करण्यास मंजुरी दिली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात ३० मे २०२५ पर्यंत धान्याची उचल पूर्ण करणे आणि ३० जून २०२५ पर्यंत वाटप पूर्ण करणे आवश्यक आहे. जून, जुलै आणि ऑगस्ट २०२५ या तीन महिन्यांचे अन्नधान्य लाभार्थ्यांना एकत्रितपणे मिळणार असुन लाभार्थ्यांनी वेळेत अन्नधान्य उपलब्ध करुन घेण्याचे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.



रास्तभाव दुकानदारांनी सकाळपासून संध्याकाळपर्यंत दुकान उघडे ठेवावे आणि दुकानाच्या दर्शनी भागात या तीन महिन्यांच्या अन्नधान्य वाटपाबाबतचा फलक लावावा. अन्नधान्याचे वितरण ई–पॉस मशिनद्वारेच करण्यात येणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना प्रत्येक महिन्यासाठी स्वतंत्र बायोमेट्रिक (अंगठा) प्रमाणीकरण करणे आवश्यक असल्याचेही कळविण्यात आले आहे.

## कोपरगाव रेल्वे स्टेशनच्या गुड शेडचे काम वेळेत पूर्ण करा

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगाव, राहाता तालुक्यासह शेजारील तालुक्याच्या शेतकऱ्यांना खरीप–रब्बी हंगामासाठी वेळेत खतांचा पुरवठा व्हावा यासाठी कोपरगाव रेल्वे स्टेशन येथे खतांचा साठा करण्यासाठी गुड शेड बांधण्याचे सुरु असलेले काम अतिशय संथ गतीने सुरु आहे.हे काम जलदगतीने करून वेळेत पूर्ण करा अशी मागणी आ.आशुतोष काळे यांनी मध्य रेल्वेच्या पुणे विभागाचे विभागीय मॅनेजर राजेश कुमार वर्मा यांना दिलेल्या लेखी पत्रात केली आहे.

कोपरगाव रेल्वे स्टेशनवर विविध कंपन्यांच्या खत साठा करण्यासाठी पूर्वीचे चार वॅगण क्षमतेचे गुड शेड उपलब्ध आहे. परंतु अधिकचा खत साठा उतरविण्यासाठी भारत सरकारच्या खत आणि रसायने मंत्रालयाने कोपरगाव रेल्वे स्टेशनवर खत रेक पॉइंट मंजूर केला असून कोपरगाव रेल्वे स्टेशनच्या परिसरात रेल्वे विभागाने नव्याने १७ वॅगण क्षमतेचे गुड शेड बांधण्याचे टेंडर मागील वर्षी रेल्वे विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आले होते. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर गुड शेड बांधण्याचे काम घेतलेल्या सबंधित ठेकेदाराकडून फेब्रुवारी महिन्यात काम देखील सुरु करण्यात आले आहे. परंतु आजपर्यंत ह्या गुड शेड बांधण्याचे काम पूर्ण झालेले नाही.



काम सुरु करण्यात आल्यापासून दोन ते तीन महिन्यात गुड शेड बांधण्याचे काम पूर्ण होणे अपेक्षित होते परंतु अतिशय संथ गतीने काम सुरु असल्यामुळे पाच महिन्याचा कालावधी पूर्ण होत आला असला तरी अजूनही हे काम पूर्ण होवू शकले नाही. खरीप हंगामाची तयारी करण्यासाठी पावसाळयापूर्वी शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात खतांची मागणी होत असते. त्यामुळे खत कंपन्या देखील मोठ्या प्रमाणात रेल्वे वॅगणने खतांचा पुरवठा करीत असतात. कोपरगाव रेल्वे स्टेशनवर १७ वॅगण खते येणार आहेत. परंतु १७ वॅगण खते ठेवण्यासाठी गुड शेड बांधण्याचे कामच पूर्ण झालेले नाही. पावसाळा जरी जून महिन्यात सुरु होत असला तरी यावर्षी मे महिन्यात पडलेल्या अवकाळी पावसाने सर्वत्र दाणादाण उडवून दिली आहे. त्या पार्श्वभूमीवर गुड शेड बांधण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण होणे अत्यंत गरजेचे आहे. जर गुड शेड बांधण्याचे काम वेळेत पूर्ण झाले नाही तर १७ वॅगण खतांच्या गोण्या ह्या प्लॅटफॉर्मवरच उतराव्या लागणार आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु असून खते ही हायड्रोग्राफिक उत्पादने असल्याने, मुसळधार पावसामुळे खताच्या गोण्या ओल्या होवून अनलोडिंग दरम्यान व्यापारी आणि खत कंपन्यांचे मोठे नुकसान होवू शकते व त्याचा परिणाम कुठेतरी शेतकऱ्यांना वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात खते उपलब्ध होण्यावर होणार आहे. त्यासाठी कोपरगाव रेल्वे स्टेशनवर सुरु असलेले गुड शेड बांधण्याचे लवकरात लवकर पूर्ण करावे असे आ.आशुतोष काळे यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

## संजीवनी पतसंस्थेच्या स्वीकृत संचालकपदी पराग संधान व महेंद्र नाईकवाडे

**● कोपरगाव । वीरभूमी–**

सहकार महर्षी शंकरराव कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली संजीवनी सहकारी पतसंस्थेच्या स्वीकृत संचालकपदी अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान आणि प्रसिद्ध युवा उद्योजक महेंद्र नाईकवाडे यांची निवड करण्यात आली आहे. दोन्ही नविन संचालकांची निवड संस्थेच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असून, त्यांच्या माध्यमातून संस्थेच्या कार्यात नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

नवीन संचालकांचा सत्कार संस्थेचे चेअरमन प्रदीप नवले व उपाध्यक्ष संदीप गुरुळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी उपाध्यक्ष राजेंद्र परजने, संचालक राजेंद्र बागुल, अनंत पाटील बडवर, श्रीकांत चांदगुडे, गणपत राऊत,जयराम सांगळे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही.व्ही. रोहमारे व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

संजीवनी सहकारी पतसंस्था ही माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी दूरदृष्टीने शेतकरी, कामगार, ठेवीदार आणि व्यापारी वर्गाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्थापन केलेली एक महत्वाची आर्थिक संस्था आहे. या संस्थेने गेल्या काही दशकांपासून ग्रामीण भागात आर्थिक सक्षमतेसाठी मोलाचे योगदान दिले आहे.

नवीन संचालक पराग संधान हे अमृत संजीवनीचे यशस्वी नेतृत्व करत असून त्यांचा अनुभव आणि दूरदृष्टी संस्थेस लाभदायक ठरेल. तर महेंद्र नाईकवाडे हे युवा पिढीतील यशस्वी उद्योजक असून त्यांनी उद्योगक्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

नवीन संचालकांची निवड झाल्यानंतर संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार सौ. स्नेहलताताई कोल्हे आणि युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी दोघांचे हार्दिक अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## फ्लेक्सवर कारवाईकाठी सह्याद्री छावा संघटनेचे जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषण

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरात मोठ्या प्रमाणात असलेल्या विनापरवाना आणि धोकादायक होर्डिंगवर कारवाई करावी व एकाच ठिकाणी १० वर्षापासून कार्यरत असलेल्या ५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अहिल्यानगर येथील कर्मचाऱ्यांची बदली करण्याच्या मागणीसाठी सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर शुक्रवारी (दि.३० मे) उपोषण करण्यात आले. या उपोषणात छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, जिल्हा सचिव हजरत शेख, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, शाहीर कान्हू सुंबे, संदीप गायकवाड, दत्ता वामन, दीपक वर्मा, सुभाष काकडे, सुखदेव पवार आदी उपस्थित होते.



नगर शहरात मोठ्या प्रमाणात विनापरवाना आणि धोकादायक होर्डिंग उभ्या राहिल्या असून, त्याकडे महापालिकेचे अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. महापालिका हद्दीत अनेक ठिकाणी सुरक्षा नियम धाब्यावर बसवून, विद्युत महावितरणच्या परवानगीविना अनधिकृत होर्डिंग उभारले गेले आहेत. विनापरवाना होर्डिंगच्या एजन्सीवर गुन्हा दाखल करून त्यांचा परवाना रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच ५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अहिल्यानगर येथील ज्या कर्मचाऱ्यांना बदलीचा कालावधी पूर्ण झालेला असून, ते मागील दहा वर्षापासून त्याच ठिकाणी काम करत आहे. वेळोवेळी उपसंचालक क्रीडा व युवक सेवा संचलनालय यांच्याशी पत्रव्यवहार व पाठपुरावा करून प्रतिसाद मिळालेला नाही. सदर प्रकरणी तक्रारीची चौकशी करून, त्या चौकशीचा केवल फार्स करण्यात आला आहे. चौकशी अहवाल अद्याप तक्रारदार यांना देण्यात आलेला नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

१०–१० वर्षे सलग एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची जिल्हा बाहेर बदली करावी, त्यांची खातेनिहाय चौकशी करावी, २०१५–१६ मधील बोगस भरती प्रकरणी ज्या कर्मचाऱ्यांचे नावे एफआयर मध्ये आहेत त्या सर्व कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तीकेत गुन्ह्यांची नोंद तात्काळ करण्यात यावी, वरिष्ठ लिपिक व त्यांची पत्नी दोन्हीही शासनाचे नियम डावलून एचआरए भत्ता घेत असून, त्याची देखील चौकशी करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# अण्णा हजारे यांच्या जन्मदिनानिमित्त विविध विकासकामे व पुरस्कार वितरण सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येणार

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । राळेगणसिद्धी येथे अधिकाऱ्यांसमवेत नियोजन बैठक

**● पारनेर । वीरभूमी–**

ज्येष्ठ समाजसेवक पद्मविभूषण अण्णा हजारे यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून तालुक्यातील विविध विकासकामांचा शुभारंभ तसेच अण्णा हजारे यांच्या नावाने सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ति आणि संस्थाना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांचा वितरण सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला असल्याची माहिती जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

यासंदर्भात मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत राळेगणसिद्धी येथे वरीष्ठ अधिकारी आणि प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. बैठकीत कार्यक्रमाची रूपरेषा, ठिकाण आणि अन्य नियोजना बाबत विभगाच्या अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहीती घेतली.



या बैठकीला ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, आ. काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घारगे, भाजपाचे अध्यक्ष राहूल शिंदे यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

राळेगण येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, सौर उर्जा प्रकल्प, कृष्णा पाणीपुरवठा योजना, जलजीवन योजना, जिल्हा परिषदेच्या शाळा खोल्या आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामांचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या उपस्थितीत होणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या वाढदिवसाच्या निमिताने स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी या संस्थेकडून देण्यात येणाऱ्या श्री. अण्णा हजारे सामाजिक गौरव पुरस्काराने सामाजिक संस्था आणि कार्यकर्त्यांना मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत गौरविण्यात येणार आहे.

मंत्री विखे पाटील यांनी नियोजन बैठकीत सर्व विभागांनी पूर्ण केलेल्या कामांचा आढावा घेवून सर्व काम एक आठवड्यात पूर्ण करण्याचे निर्देश दिले. शाळा खोल्यांचे उद्घाटन करताना सर्व वर्ग डिजिटल क्लासरुम करण्याच्या सूचनाही दिल्या. सभेच्या ठिकाणाची पाहाणी करून मंत्री विखे पाटील यांनी पावसाची शक्यता लक्षात घेवून त्यादृष्टीने कार्यक्रमाचे नियोजन करण्याची सूचना पदाधिकारी कार्यकर्ते आणि प्रशसनाला दिल्या.

स्वामी विवेकानंद यांच्या जयंती दिनी या पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून, यंदाच्या वर्षी माऊली सेवा प्रतिष्ठानचे डॉ. राजेंद्र धामणे व सौ.सुचेता धामणे, बीड जिल्ह्यातील गेवराई येथील आई संस्थेचे संतोष गर्जे, कोल्हापूर येथील सावली केअर सेंटरचे अध्यक्ष श्री. किशोर देशपांडे, शेवगाव तालुक्यातील उचल फौंडेशनचे अध्यक्ष सचिन खेडेकर यांना यावर्षीचा पुरस्कार यापुर्वीच जाहीर झाले आहेत.

बैठकीनंतर माध्यमांशी बोलतांना मंत्री विखे पाटील म्हणाले की, पद्मविभूषण अण्णा हजारे हे आपल्या जिल्ह्याचे भूषण आहेत. त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी निमंत्रित करण्यात आले आहे. अण्णांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणारा सत्कार सोहळा आणि विविध विकासकामाचा शुभारंभ जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या दृष्टीने अभिमानाचा क्षण असेल.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

## अहिल्यादेवींच्या विचारांशी सुसंगत सांस्कृतिक महोत्सव आयोजनाने

# जिल्ह्याचा नावलौकीक अधिक उंचावला

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यादेवींच्या विचारांशी सुसंगत असा सांस्कृतिक महोत्सव आयोजित करून जिल्ह्याचा सांस्कृतिक नावलौकीक अधिक उंचावण्याचा यशस्वी प्रयत्न विचार भारती आणि जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून झाला असल्याचे गौरवोद्गार जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी काढले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधून विचार भारती आणि जनसेवा फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अहिल्यानगर गौरव आणि पालकमंत्री महोत्सवाचे उद्घाटन ना. विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देवून जिल्ह्याचा गौरव झाला. मात्र अहिल्यादेवी मांडलेल्या विचारांचा वस्तूपाठ नव्या पिढी समोर आणायचा असेल तर त्यांच्या विचाराने आपल्याला वाटचाल करावी लागेल.



अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनपट भारतीय इतिहासातील एक तेजस्वी अध्याय असल्याचा उल्लेख करून मंत्री विखे पाटील म्हणाले की, त्यांचे कार्य केवळ राज्यापुरते सिमीत नव्हते तर संपूर्ण भारत वर्षासाठी प्रेरणादायी ठरले. धर्म न्याय आणि सामाजिक सुधारणा आणि भारतीय संस्कृतीचे पुनरूत्थान करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे.

जिल्ह्याची सुपूत्री असल्याचा अभिमान आपल्या सर्वांना आहेच, परंतू यापेक्षाही महत्वाचे म्हणजे सामाजिक सुधारणातून महिलांच्या सबलीकरणाचा पाया त्यांनी अधिक मजबूत केला. हीच प्रेरणा घेवून शहरामध्ये त्यांचे भव्य स्मारक उभारून महिलासांठी काम सुरू करणार असल्याचे सुतोवाच पालकमंत्री विखे पाटील यांनी केले.

जिल्ह्याला लाभलेला सांस्कृतिक वारसा या महोत्सवातून अधोरेखीत झाला असून, जिल्ह्यातील कलाकारांनी यामध्ये दिलेलै योगदान खूप कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

अहिल्यादेवींच्या प्रत्येक जयंतीदिनाला असा महोत्सव आयोजित करून हा जिल्हा अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांवर वाटचाल करणारा असल्याचा संदेश देण्यासाठी भविष्यात प्रयत्नशील राहण्याची ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली.

महोत्सवात झालेल्या यशस्वी स्पर्धक आणि कलाकारांचा मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, अरूण कुलकर्णी, महोत्सव समितीच्या सौ. धनश्री विखे पाटील, माजी महापौर बबासाहेब वाकळे, निखिल वारे, धनंजय जाधव यांच्यासह विचार भारतीचे तसेच महोत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा उत्साहात



**● नगर । वीरभूमी–**

सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट, नगर चॅप्टरच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या पंधरवडामीटिंगमध्ये इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. उद्योजकांच्या विकासासाठी आणि नव्या पिढीला दिशा देण्याच्या उद्देशाने काम करणाऱ्या या ट्रस्टच्या वतीने गुणवंतांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाप्रसंगी सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचे चेअरमन अजित पवार, सेक्रेटरी नंदेश शिंदे, खजिनदार सचिन शिरसाठ, नगर चॅप्टरचे सर्व सदस्य, क्रॉस चॅप्टरचचे सदस्य, शहरातील उद्योजक व पुणे येथील व्यावसायिक प्रशिक्षक उपस्थित होते.

चेअरमन अजित पवार म्हणाले की, दहावी व बारावी ही विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची पायरी असून, त्यात मिळवलेले यश म्हणजे त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा मजबूत पाया आहे. या यशातून विद्यार्थ्यांनी अधिक प्रेरणा घेत सातत्याने पुढे वाटचाल करावी. त्यांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीचे महत्त्व स्पष्ट करुन विद्यार्थ्यांना भविष्यात योग्य दिशा निवडण्याचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात उद्योजकांच्या पाल्य असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार पालकांसह करण्यात आला. सत्कारमूर्तींमध्ये पायल धनंजय पवार, अंजली राठोड, पीयुष गुंडू, सर्वेश तवले, ऐश्वर्या ठाणगे, दिव्या राणे, आणि आर्चित कदम यांचा समावेश होता. त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी पालकांच्या वतीने ड. तवले यांनी ट्रस्टच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत आभार मानले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे असे उपक्रम समाजाला दिशा देतात, असे ते म्हणाले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उद्योजक सचिन राणे, हॉटेल सुवर्णम प्राईडचे महेश धुमाळ आणि तोडमल क्लासेसचे अक्षय तोडमल यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदेश शिंदे यांनी केले, तर आभार ट्रस्टचे खजिनदार सचिन शिरसाठ यांनी मानले.

## शनैश्वर सोसायटीच्या अध्यक्षपदी विश्वनाथ बारगळ; उपाध्यक्षपदी सखाहरी सोनवणे

**● कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील वडगाव येथील शनेश्वर सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी कोल्हे गटाचे विश्वनाथ वाळीबा बारगळ तर उपाध्यक्षपदी सखाहरी विठ्ठल सोनवणे यांची नुकतीच बिनविरोध निवड झाली त्याबददल त्यांचे संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार सौ. स्नेहलता कोल्हे व सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे युवा अध्यक्ष विवेक भैय्या कोल्हे यांनी अभिनंदन केले आहे.

विश्वनाथ बारगळ यांच्या नावाची सुचना दौलतराव सोनवणे यांनी केली तर त्यास रमेश कांगणे यांनी अनुमोदन दिले. उपाध्यक्षपदासाठी मच्छिंद्र बारगळ यांनी सुचना केली तर त्यास भिमराज सोनवणे यांनी अनुमोदन दिले. निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून कोपरगाव कार्यालयाचे सहायक निबंधक श्री. एस. पी. नेरे उपस्थित होते. या निवडीबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.





नवनिर्वाचित अध्यक्ष विश्वनाथ बारगळ सत्कारास उत्तर देतांना म्हणाले की, माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी सहकारी संस्थांना पाठबळ देवुन त्यामाध्यमांतुन या भागाचा विकास साधण्यांसाठी मोठे काम केले असुन तोच वसा घेवुन युवानेते, जिल्हा बँकेचे संचालक विवेक भैय्या कोल्हे हे संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे व माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या मार्गदर्शनांखाली काम करत आहे. शनेश्वर सोसायटीच्या सर्व सभासद शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी जिल्हा बँक स्तरावर असणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणीसाठी जाणिवपुर्वक प्रयत्न करू असेही ते म्हणांले.

याप्रसंगी संचालक संदिप बारगळ, जानकाबाई भागवत आंधळे, सावित्राबाई रामचंद्र बारगळ, उत्तमराव पायमोडे आदि उपस्थित होते. कार्यकमाचे सुत्रसंचलन सचिव आण्णासाहेब निकम यांनी करून उपस्थितांचे आभार मानले. या निवडीबददल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## ग्रामस्थांच्या प्रयत्नातून जांभुळवाडी स्वतंत्र महसुली गाव

**● संगमनेर । वीरभूमी–**



साकुर ग्रामपंचायत मधून जांभुळवाडी ही स्वतंत्र ग्रामपंचायत झाली मात्र त्याला स्वतंत्र गावाचा दर्जा मिळावा यासाठी शंकर पाटील खेमनर यांच्या मार्गदर्शनाखाली समस्त गावकऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आणि हे श्रेय गावकऱ्यांचे असून कोणत्याही पुढार्याचे नाही. नवीन लोकप्रतिनिधीच्या कार्यालयातून चुकीची बातमी प्रसिद्ध झाली असून त्यांनी खोटी पत्रकबाजी करू नये करू अशी परखड प्रतिक्रिया या कामी पाठपुरावा करणारे सरपंच अण्णासाहेब कुदनर यांनी दिली आहे.

नुकतीच जांभुळवाडी गावाला स्वतंत्र महसुली दर्जा प्राप्त झाला या कामासाठी गावचे सरपंच अण्णासाहेब कुदनर, अ‍ॅड. देवराम चोरांबले, शिवाजी कातोरे, विलास डोके, सुभाष कुदनर, गोरख भडकवाड, आसिफ शेख यांसह ग्रामस्थांनी पुढाकार घेतला. या कामी गावकऱ्यांनी पुढाकार घेतला व त्यांना तत्कालीन तहसीलदार आणि प्रांत यांनी मोठी मदत केली.

### सरपंच अण्णासाहेब कुदनर यांची माहिती

या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून जांभुळवाडी गाव हे स्वतंत्र झाले आहे यापूर्वी या गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत मिळण्याकरता तत्कालीन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. आता स्वतंत्र गाव झाले असून याचा आनंद आम्हा सर्वांना आहे. मात्र गावात बातमी येण्यापूर्वीच श्रेय घेण्यासाठी काही लोकांनी परस्पर बातम्या प्रसिद्ध केल्या आहे. ज्यांना गाव माहिती नाही. ज्या पुढार्यांचे या गावात कोणतेही काम नाही. त्यांनी कधी आमच्या गावाकडे पाहिले नाही अशी मंडळी आता पत्रक बाजी करून या कामाचे श्रेय घेत आहे. त्यांचा काय संबंध हे कामासाठी आम्ही मागील वर्षी पाठपुरावा केला आणि आम्हाला गावात माहीत होण्याच्या अगोदरच नवीन लोकप्रतिनिधीच्या कार्यालयातून बातम्या प्रसिद्धीला दिल्या गेल्या ही कुठली पद्धत, अशी खोटी पत्रकबाजी करणे हे अत्यंत चुकीचे आहे. श्रेय गावकऱ्यांचे व एकीचे आहे. कष्ट गावकऱ्यांचे आहे. कोणीही फुकटची प्रसिद्धी करू नये अन्यथा आमच्या गावात येणे आम्ही बंद करू असा इशाराही सरपंच व इतर कार्यकर्त्यांनी दिला आहे.

जांभुळवाडी गावाला स्वतंत्र महसुलीचा दर्जा मिळाल्यानंतर गावकऱ्यांनी आनंद साजरा केला. मात्र काही लोकांनी खोट्या बातम्या पसरवून श्रेय घेण्याचा प्रयत्न केल्याने गावकरी नाराज झाले असून या कामाचा पाठपुरावा मागील वर्षी झाला असून यामध्ये नवीन लोकप्रतिनिधी कोणताही संबंध नाही. त्यामुळे त्यांनी अशा बातम्या देऊ नये. तुमच्या कामाचा एक तरी कागद दाखवा. अन्यथा अशा फुकट श्रेय लाटणाऱ्यांना गावात येऊ देणार नाही असा इशाराही समस्त गावकरी व तरुणांनी दिला आहे. इशारा मिळतात फुकट श्रेय घेणाऱ्या अनेकांनी आपल्या सोशल मीडियावरील पोस्ट डिलीट केल्या आहेत

## अकोले मध्ये २ जून रोजी महारोजगार मेळा

### १७ नामांकित कंपन्याची उपस्थिती । १८०० युवकांना रोजगार मिळणार

**● अकोले । वीरभूमी–**

माजी मंत्री स्व. मधुकरराव पिचड यांच्या ८४ व्या जयंती निमित्त अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी व रोटरी क्लब अकोले सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि. २ जून रोजी सकाळी १० वाजता पॉलिटेक्निक कॉलेज अकोले येथे महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर व रोटरी क्लबचे अध्यक्ष प्राचार्य विद्याचंद्र सातपुते यांनी दिली.

या महारोजगार मेळाव्यामध्ये पुणे व नाशिक जिल्ह्यातील एकूण १७ नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. यामाध्यमातून सुमारे १८०० युवकांना रोजगाराची संधी मिळणार आहे.



या १७ कंपन्याचे एच. आर. मॅनेजर मुलाखतीसाठी उपस्थित राहणार आहेत. या महारोजगार मेळाव्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील डिग्री, डिप्लोमा, आय.टी.आय., एम. बी. ए., बी-फार्मसी, बी.ए., बी. कॉम., बी.एस.सी., १० वी, १२ वी उत्तीर्ण १८०० विद्यार्थ्यांना रोजगार मिळणार आहे.

तरी सर्व इच्छुक विद्यार्थ्यांनी/ उमेदवारांनी मुलाखतीसाठी आपला रिज्युम व कागदपत्रेसह उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेचे सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख, खजिनदार धनंजय संत व सर्व कार्यकारिणी सदस्य तसेच रोटरी क्लब अकोले सेन्ट्रलचे सेक्रेटरी अमोल देशमुख, उपाध्यक्ष दिनेश नाईकवाडी, सह सेक्रेटरी समीर सय्यद, खजिनदार संदीप मोरे, पब्लिक इमेज डायरेक्टर हभप. दीपक महाराज देशमुख व सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी केले.

या महारोजगार मेळाव्यासाठी नाशिक येथील युवा शक्ती फाउंडेशन यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

या महारोजगार मेळाव्याचे उद्घाटन सोमवारी सकाळी १० वाजता संस्थेचे कार्यकारी विश्वस्त, माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या हस्ते व रोटरी क्लब अकोले सेन्ट्रलचे पब्लिक इमेज डायरेक्टर हभप. दीपक महाराज देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी संस्थेचे सर्व कायम विश्वस्त, विश्वस्त, पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य व रोटरी क्लबचे सर्व पदाधिकारी व सदस्य, अहिल्यानगर जिल्हातील सर्व संस्थांचे प्राचार्य आणि युवाशक्ती फाउंडेशनचे वैभव कुलकर्णी, नवनाथ भराडे, सागर पवार व अमोल धोंगडे हे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती अकोले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्करराव शेळके, पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. डी. पल्हाडे, एमबीएचे डायरेक्टर डॉ. प्रशांत तांबे, आय.टी.आयचे प्राचार्य अरुण भालेराव, मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. पल्लवी फलके- कोटकर यांनी दिली.

## मुसळधार पावसाने केडगावात झालेल्या नुकसानीची उपायुक्तांकडून पाहणी; नगरसेवक कोतकर यांची उपस्थिती

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

नुकतेच झालेल्या मुसळधार पावसाने केडगावमध्ये पूर सदृश्य परिस्थिती निर्माण होवून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. झालेल्या नुकसानीची मनपा उपायुक्त विजयकुमार मुंडे व माजी नगरसेवक मनोज कोतकर यांनी पहाणी केली.



मुसळधार पावसामुळे केडगावमध्ये मोठ्या प्रमाणात पूर परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे केडगावमध्ये राहत असणाऱ्या काही नागरिकांच्या घरात देखील पाणी शिरले. केडगाव अमरधामची संरक्षण भिंत देखील पावसाने वाहून गेली. देवी रोड वरील आंबेडकर भवनाची भिंतही कोसळली. कांबळे मळा येथील पूल वाहून गेला आहे.

झालेल्या नुकसानीची पहाणी करुन तातडीने उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनाने माजी नगरसेवक मनोज कोतकर यांनी मनपा उपायुक्त विजयकुमार मुंडे यांच्याशी संपर्क साधून त्यांना पाहणी करण्यासाठी बोलावून घेतले. यावेळी नुकसान झालेल्या भागाची पाहणी करण्यात आली.

मनोज कोतकर यांनी मुसळधार पावसाने केडगावमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मनपा प्रशासनाच्या माध्यमातून तातडीने समस्या सोडविण्यासाठी व उपाययोजना करण्यासंदर्भात पाठपुरावा सुरु आहे. लवकरच मान्सून सक्रीय होणार असून, भविष्यातील संकट ओळखून उपाययोजना कराव्या. लवकरच अमरधामची भिंत बांधली जाणार असून, नागरिकांनी देखील घाबरुन न जाता, मनपा प्रशासन त्यांच्या पाठिशी असल्याचे भावना व्यक्त केली. तर नागरिकांना देखील नुकसान भरपाई मिळण्याची मागणी त्यांनी केली.

उपायुक्त मुंडे यांनी झालेल्या नुकसानी संदर्भात तातडीने ठोस पाऊले उचलून उपाययोजना केल्या जाणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी शरद ठुबे, सुमित लोंढे, सोनु बापू घेबूड, बाला कोतकर, ऋषी गवळी, शुभम लोंढे, भाऊ गुंड आदी उपस्थित होते.

# श्रीगोंदा तालुक्यातील अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करा

### आ. विक्रमसिंह पाचपुते यांचे प्रशासनाला आदेश । पत्रकार परिषदेत दिली माहिती

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

यावर्षी मे महिन्याच्या सरासरीपेक्षा १५ पट जास्त म्हणजेच ३६९ मिलिमीटर अवकाळी पाऊस झाल्याने श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काढणीला आलेली पिके, वखारीतील साठवलेला कांदा, फळबागा, भुईमूग, घरे आणि पशुधनाचेही अतोनात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर कोणताही शेतकरी आपत्ती निधीपासून वंचित राहू नये यासाठी सरसकट पंचनामे करण्याचे आदेश तहसीलदार आणि तालुका कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, अशी माहिती आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी माऊली संपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी माजी मंत्री बबनराव पाचपुते, तहसीलदार प्रविण मुदगल आणि तालुका कृषी अधिकारी शशिकांत गांगर्डे उपस्थित होते.

यावेळी आ. पाचपुते यांनी सांगितले की, यंदा मान्सूनपूर्व पावसाने मे महिन्यात ऐतिहासिक हजेरी लावली. सलग महिनाभर पडलेल्या या पावसामुळे पाणीटंचाईवर मात



झाली असली, तरी शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. उभी पिके, फळबागा, कांदा आणि भुईमूग यांच्यासह वखारीतील साठवणुकीच्या कांद्याचेही मोठे नुकसान झाले. काही ठिकाणी पूर, वादळ आणि वीज पडण्याच्या घटनांमुळे पशुधनालाही फटका बसला. यामुळे महसूल विभाग, आपत्ती व्यवस्थापन आणि कृषी विभागाची संयुक्त बैठक घेऊन तालुक्यातील नुकसानीचा आढावा घेण्यात आला. शासनस्तरावर येत्या काही दिवसांत आपत्ती निधी जाहीर होण्याची शक्यता असून, श्रीगोंदा-नगर मतदारसंघातील कोणताही शेतकरी या मदतीपासून वंचित राहू नये यासाठी सरसकट पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, राज्यातील परिस्थितीही गंभीर असून, महसूलमंत्री आणि पालकमंत्र्यांना भेटून आपत्तीग्रस्तांना मदत मिळवण्यासाठी आग्रह धरला जाणार आहे.

#### ॲग्रिस्टॅक आणि फार्मर्स आय डी नोंदणी आवश्यक

■ तालुका कृषी अधिकारी शशिकांत गांगर्डे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी बी-बियाणे मिळवण्यासाठी कृषी साइटवर अर्ज नोंदवावेत. येत्या सोमवारपासून तीन दिवस राज्य सरकारच्या ‘विकसित कृषी संकल्प’ उपक्रमांतर्गत तालुक्यातील १२ गावांमध्ये कृषी मेळावे आयोजित केले जाणार आहेत. या मेळाव्यांमध्ये शेतकऱ्यांना शासकीय योजनांची माहिती देण्यासह शास्त्रज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळेल. सर्व शेतकऱ्यांनी या मेळाव्यांत सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

#### ॲग्रिस्टॅक आणि फार्मर्स आय डी नोंदणी आवश्यक

■ आ. पाचपुते यांनी शेतकऱ्यांना ॲग्रिस्टॅक कार्ड आणि फार्मर्स आय डी नोंदणीचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले, जरी सरसकट पंचनामे झाले, तरी शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी ॲग्रिस्टॅक आणि फार्मर्स आय डी असणे गरजेचे आहे. गेल्या काही महिन्यांपासून नोंदणी मोहीम सुरू असली, तरी संथ गतीमुळे अनेक शेतकऱ्यांची नोंदणी बाकी आहे. तालुक्यातील महा-ई-सेवा केंद्रांचा आढावा घेऊन बंद केंद्रांचे परवाने रद्द करून नवीन परवाने दिले जाणार आहेत. त्यांनी शेतकऱ्यांना आपला आय डी नोंदणीकृत आहे का, याची खातरजमा करून घेण्याचे आवाहन केले, अन्यथा मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

#### शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रयत्न

■ आ. पाचपुते यांनी शेतकऱ्यांना आश्वासित केले की, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपासून कोणीही वंचित राहणार नाही. शासनाकडून लवकरात लवकर मदत मिळवण्यासाठी ते स्वतः पाठपुरावा करणार असून, शेतकऱ्यांनीही आवश्यक कागदपत्रे आणि नोंदणी पूर्ण करून प्रशासनाला सहकार्य करावे, अशी विनंती त्यांनी केली.

#### ॲग्रिस्टॅक आणि फार्मर्स आय डी नोंदणी आवश्यक

■ तहसीलदार प्रविण मुदगल यांनी सांगितले की, येत्या दोन-तीन दिवसांत तालुक्यातील सर्व शेतकरी आणि नुकसानग्रस्त नागरिकांचे सरसकट पंचनामे केले जाणार आहेत. यासाठी संबंधित विभागांना तातडीने कामाला लागण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यांनी सर्वांना प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.